# म. सं. कौ. हिं. का. अर्ज क्र.२५/२०२२ मधील आदेश निशाणी क्र.०६

## CNR No. MHRT050007392022

(भारती सुधिर जाधव व. २ विरुध्द सुधिर सावळाराम जाधव व. ४)

अर्जदाराने हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियमाचे कलम १८, १९ व २२ नुसार अर्ज दाखल केला असून मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत अंतरिम पोटगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०२. अर्जदाराचे थोडक्यात असे कथन आहे की, तिचे व सामनेवाला क्र. १ चे विवाह दि.२४.०५.२०१६ रोजी झाला आहे. सामनेवाला क्र. २ व ३ हे तिचे सासू–सासरे आहेत व सामनेवाला क्र.४ हा तिचा दिर आहे. विवाहानंतर अर्जदार ही सामनेवालाकडे विठ्ठलवाडी, ठाणे येथे नांदण्यासाठी गेली. सामनेवाला क्र.१ हा लग्नापुर्वीपासूनच पुणे येथे एका हॉटेलमध्ये आचारीचे काम करीत होता. पुणे येथे त्याच्या स्वतःच्या मालकीचे तीन खोल्यांचे घर आहे. अर्जदारचे असे कथन आहे की, लग्नानंतर सुरुवातीचे साधारण चार महिने सुखाचे गेले त्यानंतर सामनेवाला क्र.१ व २ यांच्या वागण्यात बदल होण्यास सुरुवात झाली. सामनेवाला क्र. १ याला दारुचे व तंबाखूचे व्यसन आहे असे अर्जदाराच्या लक्षात आले. सामनेवाला क्र. १ हा तिला काहीही कारण नसताना शिवीगाळ करून तुला येथे घरकाम करायलाच आणली आहे असे म्हणत होता. अर्जदाराने जेव्हा त्याला दारु का पिता म्हणून विचारले तेव्हा त्याने तिला, तुला येथे राहायचे असेल तर रहा नाहीतर निघून जा असे म्हटले. सामनेवाला क्र. ४ हा सुध्दा अर्जदाराला दारू पिऊन मारझोड करून शिवीगाळ करत असायचा. नवीनच लग्न असल्यामुळे व कालातंराने सामनेवाला क्र. १ याच्या वागण्यात सुधारणा होईल या आशेने अर्जदाराने तिच्या आई–वडीलांकडे तिला होत असलेल्या त्रासाबाबत सांगितले नाही. अर्जदार ही जेव्हा सामनेवाला क्र. १ याच्याकडे खर्चाकरीता पैसे मागत होती तेव्हा त्याने पैसे देण्यास नकार दिला व सर्व पगार तो त्याच्या आईजवळ देत असे. त्या दरम्यान अर्जदाराला दिवस गेले. गरोदरपणात ती घरातील सर्व कामे करत होती. माहे जुन २०१७ मध्ये अर्जदाराला सातव्या महिन्याचा त्रास होत होता तेव्हा देखील जेवणाला भाकरी न करता भात, आमटी व भाजी केली परंतु सामनेवाला क्र. १ याने त्याचा उहापोह करून अर्जदाराला शिवीगाळ करून मारहाण केली. त्याने अर्जदाराला पाण्याची बाटली फेकून मारली ती तिच्या पोटावर लागली त्यामुळे तिला प्रचंड वेदना झाल्या. काही दिवसांनी अर्जदार ही

बाळंतपणासाठी माहेरी गेली. त्यानंतर माहे ऑक्टोबर २०२० मध्ये सामनेवाला क्र. १ ने अर्जदाराला मुलासह घरातून हाकलून दिले. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या मुलासह माहेरी राहत आहे. अर्जदारचे असे आरोप आहेत की, सामनेवाला हे तिच्याशी अतिशय क्रुरतेने वागले त्यामुळे तिला मानसिक व शारिरीक त्रास झाला. अर्जदाराला तिच्या जिवाला सामनेवाला यांच्यापासून धोका आहे अशी भिती निर्माण झाली आहे. सामनेवाला यांनी अर्जदार व तिच्या मुलाकरीता अन्न, वस्त्र, निवारा व औषधपाण्याची कोणतीही सोय केलेली नाही.

**०३.** अर्जदाराचे असेही कथन आहे की, सामनेवाला क्र. १ याला आचारीच्या कामाकरीता दरमहा रु.४५,०००/– पगार आहे. तसेच त्याच्याकडे शेती असून त्यातूनही त्याला उत्पन्न मिळते. त्याच्यावर कोणीही अवलंबून नाही. अर्जदाराचे असे कथन आहे की, तिचा मुलगा मानस हा एल.टी.टी. शाळेत नर्सरीमध्ये शिकत आहे. अर्जदाराने शाळेला डोनेशन दिले आहे. तसेच शाळेची फी व इतर खर्च म्हणून तिला रु.२५,०००/– एवढा खर्च झाला आहे. सबब, अर्जदाराने मुळ अर्ज निकाली लागेपर्यंत तिच्या व तिच्या मुलाच्या अन्न, वस्त्र, औषोधोपचार व जीवनावश्यक लागणा–या वस्तूंसाठी दरमहा रु.३०,०००/– म्हणून अंतरिम पोटगीची मागणी केली आहे व निवासाकरीता दरमहा रु.५,०००/– ची मागणी केली आहे.

**०४.** सामनेवाला क्र. १ व ३ यांनी प्रस्तुत अर्जाला नि.१२ कडे आपले लेखी म्हणणे सादर केले आहे. सामनेवाला यांनी अर्जदारांशी असलेले नातेसंबंध कुठेही नाकारलेले नाहीत. परंतु त्यांनी अर्जदाराने लावलेले आरोप नाकारले आहेत. सामनेवाला यांचे असे कथन आहे की, तो विठ्ठलवाडी येथे एका चाळीमध्ये लहानशा खोलीमध्ये वास्तव्य करीत होता व ते अर्जदार ही लग्नापुर्वी बघून गेली होती. लग्नाच्यावेळी त्याला केवळ रु.५,३००/– एवढाच पगार होता. सामनेवाला क्र. २ ही घाटकोपर येथे घरकाम करत होती. सामनेवाला क्र. ३ यांना कर्करोग असून त्यावर चार शस्त्रक्रिया झाल्या आहेत. त्याच्या औषधपाण्याचा खर्च हा सामनेवाला क्र. १ करत आहे. सामनेवाला क्र. ३ यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. सामनेवालांनी अर्जदाराच्या बाळंतपणाच्यावेळी त्याच्या मालकाकडून रु.१०,०००/– घेवून ते अर्जदारच्या हातात दिले होते. अर्जदाराच्या आईने

फोन करून सामनेवाला क्र. १ याला म्हटले की, ''बारशाला पंधरा हजार रुपये खर्च आहे ते घेवून आलात तरच या नाहीतर नाही आलात तरी चालेल.'' त्यावर सामनेवाला क्र. १ ने हातउसने पैसे जुळवून बारशाकरीता खर्च केले. अर्जदार ही विठ्ठलवाडी येथे आल्यानंतर सामनेवाला क्र. १ याच्याकडे दरमहा रु.१०,०००/– ची मागणी करू लागली. अर्जदार ही नेहमी माहेरी जाताना त्याच्याकडे अवास्तव रकमेची मागणी करत होती. सामनेवाला क्र. १ चे आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने अर्जदाराच्या मागण्या पुर्ण करणे त्याला शक्य होत नव्हते. दरम्यानच्या काळात त्याचे काम गेले असून तो आता बेरोजगार झाला आहे. सामनेवाला यांचे असेही म्हणणे आहे की, अर्जदार ही कोणतेही संयुक्तीक कारण नसताना माहेरी राहत आहे. तिने केलेल्या मागण्या ह्या बेकायदेशीर आहेत. त्यामुळे अंतरिम पोटगीचा अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** अर्जदार व सामनेवाला यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. त्या प्रत्येक मुद्दयांचा निष्कर्ष मी त्या खाली दिलेल्या कारणांकरिता मांडत आहे.

| अ.क्र. | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| ०१. | सामनेवालाकडून अर्जदाराचा कौटुंबिक हिंसाचार झाला असे सकृतदर्शनी सिध्द होते काय? | .....होकारार्थी. |
| ०२. | अर्जदार सामनेवालाकडून मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय? | .... अंशतः होकारार्थी. |
| ०३. | आदेश काय ? | ....अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ३ करिताः</u>

**०६.** अर्जदाराच्या वतीने विधीज्ञ श्री. एस. एस. शेठ यांनी अर्जातील कथनानुसार युक्तीवाद केला. त्यांनी पुढे असाही युक्तीवाद केला की, अर्जदाराच्या अर्जातील कथनांवरून

तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला असे प्रथमदर्शी सिध्द होते. अर्जदार ही सन २०२० पासून मुलासह तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला यांनी त्यांची कोणतीही तजवीज केली नाही. अर्जदाराचा मुलगा हा शिक्षण घेत असून शैक्षणिक खर्चाच्या पावत्या अभिलेखावर दाखल केल्या आहेत. दुसरीकडे सामनेवाला करीता विधीज्ञ श्री. एस. जी. चिकणे यांनी युक्तीवाद केला की, सामनेवाला क्र. १ ला केवळ रु.५,३००/– एवढाच पगार आहे त्यामुळे तो अंतरिम पोटगी देवू शकत नाही.

**०७.** अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांच्यातील असलेले नातेसंबंध अविवादीत आहे. अर्जदाराने प्रस्तुत प्रकरण हे परस्पर स्वतःच दाखल केलेले आहे. त्यामुळे मुळ अर्जावर आदेश पारित करून संरक्षण अधिकारी यांच्याकडून कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल मागविण्यात आला परंतु संरक्षण अधिकारी यांच्याकडून अद्यापही अहवाल आलेला नाही. अभिलेखावर संरक्षण अधिकारी यांचा कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल असता तर त्याच्या आधारे अर्जदाराने केलेली विधाने तपासता आली असती. असे असले तरीही अर्जदाराने केलेली कथने व सामनेवाला यांच्यावर लावलेले आरोप निराधार व खोटे आहेत असा निष्कर्ष काढला जावू शकत नाही. अर्जदार ही तिच्या चार वर्षाच्या मुलासह माहेरी राहत आहे. कोणतीही विवाहीत स्त्री कोणतेही कारण नसताना तिचे सासर सोडून माहेरी राहणार नाही. अर्जदाराच्या कथनांवरून तिच्यावर सामनेवाला क्र. १ कडून कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. दुसरी महत्वाची बाब म्हणजे अर्जदाराच्या व तिच्या मुलाच्या उदरनिर्वाहावर तसेच मुलाच्या शिक्षणावर होणा–या खर्चाकरीता तरतुद केली आहे असे सामनेवाला क्र. १ चे कुठेही म्हणणे नाही. अर्जदाराने मुलाच्या शाळेच्या फीच्या पावत्या दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदाराने तिच्या संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्र नि.१७ कडे दाखल केले आहे. त्यामध्ये अर्जदाराने तिचा सर्वसाधारण मासिक खर्च रु.३५,०००/– तसेच तिच्यावर अलवंबून असलेल्या मुलाचा अंदाजित खर्च रु.२५,०००/– तसेच उदरनिर्वाह, कपडालत्ता, वैद्यकीय खर्च व शैक्षणिक खर्च याकरीता येणारा संभाव्य खर्च रु.२५,०००/– नमुद केले आहे. मुलाच्या शिक्षणावर येणारा संभावित खर्च रास्त असल्याचे दिसून येते परंतु सर्वसाधारण मासिक खर्च रु.३५,०००/– कसे याबाबत अर्जदाराचे कुठेही स्पष्टीकरण नाही. दुसरी महत्वाची बाब म्हणजे सामनेवाला क्र. १ हा हॉटेलमध्ये आचारी काम करत असून त्याला रु.४५,०००/– दरमहा पगार आहे असे

अर्जदाराचे म्हणणे आहे परंतु त्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदाराने अभिलेखावर सादर केला नाही. एकीकडे सामनेवाला क्र. १ हा बेरोजगार असल्याचे सांगतो तर दुसरीकडे युक्तीवादादरम्यान त्याच्या विधीज्ञांनी सामनेवाला क्र. १ ला केवळ रु.५,३००/– एवढाच पगार मिळतो असे म्हटले होते. जरी सामनेवाला क्र. १ हा बेरोजगार आहे असे क्षणभर गृहित धरले तरीही अर्जदार व मुलाप्रती असलेली नैतिक जबाबदारी तो नाकारू शकत नाही.

०८. वरील विवेचनावरून मी या निष्कर्षावर येत आहे की, सामनेवाला क्र. १ कडून अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार झाला त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे. अर्जदाराने केलेली पोटगीची मागणी ही अवास्तव असल्याची दिसून येते. मुलाच्या बाबतीत अर्जदाराला सामनेवाला क्र. १ कडून वेगळया तरतुदीखाली पोटगी मागता येईल. मुलगा हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम मधील पिडीत व्यक्तीच्या व्याख्येत बसत नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने केवळ अर्जदाराचाच विचार करावा लागेल. अर्जदार व सामनेवाला क्र. १ यांचा दर्जा हा सर्वसाधारण असल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदाराला सरसकट दरमहा रु.५,०००/– इतकी अंतरिम पोटगी मंजूर करणे योग्य राहिल. सबब, मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी तसेच मुद्दा क्र. २ चे उत्तर अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र.३ च्या उत्तरादाखल खालील प्रमाणे आदेश पारीत करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज **(नि.०६)** अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. सामनेवालाला निर्देश देण्यात येते की त्यांनी, अर्जदाराला दरमहा **रू.५,०००/– (अक्षरी पाच हजार फक्त)** अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत विचाराधीन अर्ज दाखल तारखेपासून मुळ अर्ज अंतिम निकाली निघेपर्यंत द्यावी.

३. सामनेवालाला असेही निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदाराला अर्जाच्या खर्चापोटी **रु.१,०००/– (अक्षरी एक हजार फक्त)** द्यावेत.

**४.** या आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना निःशुल्क देण्यात यावी.

**५.** उभय पक्षकारांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

SANJAY MOTIRAM CHAVAN

Digitally signed by SANJAY MOTIRAM CHAVAN
Date: 2023.07.06 16:42:15 +0530

दिनांकः– ०५.०७.२०२३

( संजय मो. चव्हाण )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
खेड, ता.खेड, जि.रत्नागिरी

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Order Below Exh. 06 in Case No. | : | PWDVA No. 25-2022 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. V. V. Bamane |
| Court Name | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Court, Khed. |
| Date of Decision | : | 05.07.2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 05.07.2023 |
| Order uploaded on | : | 06.07.2023 |